**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, म्हणजे शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति सरकारच्या वचनबद्धतेचा वस्तुपाठ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन; वाराणसी इथं २ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं उदघाटन आणि लोकार्पण

- भारताने रशियाकडून तेल खरेदी थांबवल्याचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा भारताने नाकारला

- युपीआयचा गेल्या महिन्यात १ हजार ९४७ कोटी व्यवहारांसह नवीन विक्रम

**आणि**

- गाझा मधल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर, स्लोव्हेनियाचा इस्राएल बरोबरचा शस्त्रास्त्रांचा व्यापार थांबवण्याचा निर्णय

**<><><><>**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, म्हणजे शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति असलेल्या सरकारच्या वचनबद्धतेचा वस्तुपाठ असून, गेल्या दशकभरात शेतकऱ्यांच्या प्रत्येक समस्येचं निराकरण करण्यासाठी सरकारने पूर्ण क्षमतेनं काम केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज उत्तरप्रदेशमध्ये वाराणसी इथं प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा विसावा हप्ता जारी करताना बोलत होते. या हप्त्या मधून देशभरातल्या ९ कोटी ७० लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २१ हजार कोटी रुपये थेट हस्तांतरित केले जातील.

सणासुदीच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देऊन ‘व्होकल फॉर लोकल’ला पाठबळ देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

- **- ‘होल्ड बाईट’- -**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज उत्तरप्रदेशमध्ये वाराणसी इथे सुमारे २ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं उदघाटन आणि पायाभरणी केली.

यावेळी त्यांनी 'दिव्यांगजन' आणि वृद्ध लाभार्थ्यांना ७ हजार ४०० सहाय्यक साहित्याचं वितरण केलं.

दळणवळण मजबूत करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून, प्रधानमंत्री मोदी यांनी आज वाराणसी-भादोही मार्ग  आणि छितौनी-शूल टंकेश्वर मार्ग  यासह प्रमुख रस्त्यांचं रुंदीकरण आणि मजबुतीकरण प्रकल्पांचं उदघाटन केलं.  त्यांनी यावेळी हरदत्तपूर इथल्या रेल्वे पुलाचं देखील उदघाटन केलं. या पुलामुळे मोहन सराई-अदलपुरा मार्गावरची  वाहतूक कोंडी कमी होईल अशी अपेक्षा आहे.

प्रधानमंत्री मोदी यांनी दालमंडी, लहरतारा-कोटवा, गंगापूर आणि बाबतपूर इथल्या रस्ते सुधारणांसह अनेक नवीन पायाभूत सुविधा प्रकल्पांची पायाभरणी केली. शहरातल्या विद्युत पायाभूत सुविधांवर भर देणाऱ्या ८८० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या वीज प्रकल्पांचं त्यांनी उदघाटन केलं. यामध्ये स्मार्ट वितरण प्रकल्प आणि ओव्हरहेड इलेक्ट्रिकल केबल्सचं भूमिगतीकरण याचा समावेश आहे.

कर्दमेश्वर महादेव मंदिराचा जीर्णोद्धार, स्वातंत्र्यसैनिकांचं जन्मस्थान असलेल्या कारखिया गावचा विकास, आणि मुन्शी प्रेमचंद यांच्या लमाही इथल्या वडिलोपार्जित घराचं संग्रहालयात परिवर्तन करण्याच्या कामांची प्रधानमंत्री मोदी यांनी आज पायाभरणी केली. त्यानंतर त्यांनी जनसभेला संबोधित केलं.

**<><><>**

शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी सरकार अनेक योजना राबवत असून आतापर्यंत दहा कोटी शेतकऱ्यांना  एकूण २० हजार कोटी रुपये थेट आर्थिक लाभ दिला आहे, असं केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. ते बिहारमधे आयोजित शेतकरी उत्सव दिवस कार्यक्रमात बोलत होते. केंद्र सरकारनं खतांवरच्या अनुदानासाठी दोन लाख कोटी मदत दिल्याचंही चौहान यांनी सांगितलं.

**<><><>**

निवडणूक आयोगाने मतदार यादीत घोटाळा केल्याचे काँग्रेसकडे ठोस पुरावे असून या संस्थेनं आता आपली स्वायत्तता गमावली आहे, अशी टीका लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. ते नवी दिल्लीत आयोजित वार्षिक विधी परिषदेला

संबोधित करत होते. काँग्रेसनं गेली सहा महिने मतदार केंद्रनिहाय मतदान याद्यांची पडताळणी केली. मतदार याद्यातला घोटाळा काँग्रेस उघडकीस आणेल असं गांधी म्हणाले.

<><><><>

भारताने रशियाकडून तेल खरेदी थांबवल्याचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा भारताने आज नाकारला आहे. भारताने रशियाकडून तेल खरेदी थांबवली नाही असं भारताने स्पष्ट केलं. राष्ट्रीय हित आणि बाजार याला अनुसरून भारत ऊर्जा खरेदी करत असतो, भारतीय तेल कंपन्यांनी रशियाकडून तेल खरेदी थांबवल्याची माहिती आपल्याकडे नाही, असं सरकारनं म्हटलं आहे.

दरम्यान, भारत आणि रशियाचे संबंध हे काळाच्या कसोटीवर उतरल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल म्हटलं.

<><><><>

जम्मू काश्मीरमधल्या कुलगाम जिल्ह्यातल्या अखल देवसर भागात आज सकाळी सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला. या भागात दहशतवादी असल्याची माहिती सुरक्षा दलांना मिळाल्यानंतर काल संध्याकाळी शोधमोहीम सुरू करण्यात आली होती. लष्कर, जम्मू काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफने संयुक्तपणे ही मोहीम राबवली. सुरक्षा दल आणि दहशतवादी यांच्यात रात्रभर गोळीबार सुरू होता.

<><><><>

नवी दिल्लीमधल्या राष्ट्रपती भवनातील अमृत उद्यान १६ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर या दरम्यान पर्यटकांसाठी खुलं राहणार आहे. सकाळी दहा वाजल्यापासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत उद्यान खुलं असेल. तर दर सोमवारी देखभाल दुरुस्तीसाठी ते बंद ठेवण्यात येईल असं राष्ट्रपती सचिवालयाने एका निवेदनात म्हटलं आहे.

<><><><>

देशाच्या डिजिटल पेमेंटचा आधार असलेल्या युपीआय, म्हणजेच युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसनं जुलै २०२५ मध्ये १ हजार ९४७ कोटी व्यवहारांसह एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. या व्यवहारांची एकूण रक्कम तब्बल २५ लाख १० हजार कोटी रुपये इतकी आहे. ही आकडेवारी युपीआय द्वारे केलेल्या व्यवहारांमध्ये वर्षाला ३५ टक्के, तर

व्यवहार मूल्यात २२ टक्के वाढ दर्शवत असून, डिजिटल पेमेंट परिसंस्थेतलं युपीआय चं वर्चस्व अधोरेखित करत आहे.

<><><><>

गाझा मधल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर, स्लोव्हेनिया ने इस्त्राएल बरोबरचा शस्त्रास्त्रांचा व्यापार थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. स्लोव्हेनिया सरकारच्या विशेष अधिवेशनानंतर प्रधानमंत्री रॉबर्ट गोलोब यांनी शस्त्रास्त्र बंदीचा हा निर्णय जाहीर केला. अंतर्गत मतभेद आणि असहमतीमुळे युरोपियन युनियन ठोस उपाययोजना करू शकत नसल्यामुळे आपण स्वतंत्रपणे पुढे जात असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. गाझा पट्टीतल्या संघर्षामुळे आपल्या सरकारने ऑक्टोबर २०२३ पासून इस्त्रायलला लष्करी शस्त्र आणि उपकरणं निर्यात करण्यासाठी कोणतेही परवाने जारी केले नाहीत, असं ते म्हणाले.

स्लोव्हेनियाच्या संसदेने यापूर्वी आयर्लंड, नॉर्वे आणि स्पेन पाठोपाठ पॅलेस्टाईनला स्वतंत्र देश म्हणून मान्यता देणारा ठराव मंजूर केला होता. फ्रान्स, युनायटेड किंग्डम आणि कॅनडानेही गेल्या आठवड्यात पॅलेस्टिनी राज्याला मान्यता देण्याची घोषणा केली होती.

<><><><>

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला दिलेल्या संविधानानं देशात समतेचं राज्य निर्माण करण्यासह, सर्वांना समान संधी आणि प्रत्येक व्यक्तीच्या स्वप्नपूर्तीसाठी व्यवस्था तयार करण्याचं काम केलं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर इथल्या डॉ आंबेडकर महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी सोहळ्यात ते आज बोलत होते. या कार्यक्रमाला सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई देखील उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला वारसा पुढे नेण्याचं कार्य हे महाविद्यालयानं सातत्यानं करत असून ६ हजाराहून अधिक विद्यार्थी असलेल्या या महाविद्यालयानं हजारो वंचित विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवलं आहे, असं गवई यावेळी म्हणाले.

<><><><>

ग्रँडमास्टर दिव्या देशमुखनं बुद्धिबळ या खेळातलं चीनचं वर्चस्व मोडीत काढलं याबद्दल एक भारतीय म्हणून तिचा अभिमान वाटत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. फिडे विश्वचषक महिला बुद्धिबळ विजेती दिव्या देशमुख हिचा आज नागपूर मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला,

त्यावेळी ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातल्या कन्येनं इतक्या कमी वयात भारताचं नाव उज्ज्वल केलं हे पाहून आनंद झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

‘भारत-संयुक्त राष्ट्र जागतिक क्षमता विकास उपक्रमा’ अंतर्गत भारताने चार विकास प्रकल्पांचा पहिला टप्पा सुरु केला आहे. शाश्वत विकास उद्दिष्ट गाठताना ग्लोबल साऊथ च्या देशांना पाठबळ देणं, हे या प्रकल्पांचं उद्दिष्ट आहे. परराष्ट्र मंत्रालयातले सचिव तन्मय लाल यांनी काल या प्रकल्पांचं अधिकृतपणे उद्घाटन केलं. भारत-संयुक्त राष्ट्र ग्लोबल साऊथ क्षमता विकास उपक्रम, हा भारताच्या विकास भागीदारी प्रयत्नांचा नैसर्गिक विस्तार असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**//<><><><>//**